**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३२१/२०२५.**

**वैशाली वि. शोभा व इतर.**

**नि.क्र.४.**

**फिर्यादीचा कलम २२३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता प्रमाणे सत्यापण पडताळणीचा जबाब.**

**मी शपथेवर कथन करते की,**

माझे नाव – वैशाली विलास चव्हाण,

वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,

राहणार – लिहाखेडी, ता. सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर.

दिनांक २५.१०.२०२५ रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास मी व बहीण अनिता आमच्या घरी गप्पा मारत होतो. त्यावेळी फुलाबाई चव्हाण, इंदूबाई चव्हाण, सुरेखा चव्हाण, शोभा वाघ या सर्वजणी आल्या त्यांनी मला घरातून बाहेर ओढले व रस्त्यावर आणून मारहाण केली. त्यांनी माझ्या अंगावरती कपडे ठेवले नाही. व त्यांनी मला धमकी दिली की, तुला येथे राहू देणार नाही. तुला येथून हाकलून देऊ. त्यानंतर त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच माझा दीड वर्षांचा मुलगा आहे. त्याला देखील रस्त्यावर आपटले होते. त्याची परिस्थीती नाजूक असल्याने त्याला मी तीन दिवस दवाखान्यात नेले होते. त्यांच्यापासून माझ्या जिवाला धोका आहे. त्यानंतर मी अजिंठा पोलीस ठाण्यात गेले असता पोलिसांनी एन.सी. नोंदवली व मला न्यायालयात जाण्यास सांगितले होते. मला या व्यतिरिक्त अन्य काहीही सांगावयाचे नाही.

नि.अ.
वैशाली

साक्षीदाराची स्वाक्षरी

**समक्ष,**

१७/३/२६

**(ए. एच. तट्टु)**

दिनांक –१७.०३.२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.३, सिल्लोड.